विविध भारती पुणे

पूलकोसळला-भूषण-श्रद्धा-माधवी

पुण्यातील मावळमध्ये कुंडमळा इथं इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्याने काही पर्यटक बुडाल्याचं वृत्त असून दोघांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पुणे आणि पीएमआरडीए अग्निशमन दल, तळेगाव दाभाडे पोलीस दलासह राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची दोन पथकंही  दाखल असून बचाव कार्य सुरू आहे. आता पर्यन्त  38 पर्यटकांना वाचवण्यात आलं आहे. मावळ मधील कुंडमळा हे पर्यटनस्थळ आहे. आज रविवारचा सुट्टीचा दिवस असल्याने अनेक पर्यटक त्या ठिकाणी गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. पूलावर  पर्यटकांची संख्या जास्त झाल्याने हा पूल कोसळल्याची शक्यता आहे. या घटनेबाबत अधिक तपशीलाची प्रतीक्षा आहे. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. या दुर्घटनेमागील कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणार असल्याचं पवार यांनी म्हटल आहे.

कोरोना-भूषण-माधवी

राज्यात काल कोरोनाचे ५३ नवे रुग्ण आढळून आले. त्यापैकी सर्वाधिक २४ रुग्ण मुंबईतील आहेत. पुणे शहरात ११, पिंपरी-चिंचवडमध्ये तीन, तर पुणे ग्रामीण विभागात दोन रुग्ण आढळले. सध्या राज्यात ५७८ कोविड रुग्णांवर उपचार सुरू आहेत. बऱ्याच रुग्णांना सौम्य लक्षणे आहेत.

नियंत्रणकक्ष-भूषण-माधवी

आषाढी वारीसाठी राज्यातून आलेल्या भाविकांना आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचं आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या  वैद्यकीय अधिक्षक डॉ. ऊर्मिला शिंदे यांनी सांगितलं. भाविकांना बाह्यरुग्ण आणि आंतररुग्ण आरोग्य सेवा चोवीस तास उपलब्ध असेल. आळंदीच्या खासगी रूग्णालयातील चाळीस टक्के खाटा आपत्कालीन व्यवस्थेसाठी आरक्षित ठेवल्या आहेत. देउळवाड्यातही अत्यावश्यक सेवा सुविधांसह एक खाट तयार असेल. वारी काळात आपत्कालीन परिस्थितीत वेळेत उपचार मिळण्यासाठी आपत्कालीन नियंत्रण कक्षाची स्थापना ग्रामीण रूग्णालयात केली असून साथ रोग नियंत्रणासाठी एक वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह रुग्णवाहिका आणि पुरेसा कर्मचारीवर्गही तैनात केला जाणार असल्याचं डॉक्टर शिंदे यांनी सांगितलं. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर आरटीपीसीआर चाचणीची सोयही सरकारी आणि खासगी रुग्णालयात करण्याबाबतच्या सूचना दिल्याचं त्यांनी सांगितलं.

पुणेमनपा-शिवराज-माधवी

पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आज खातेप्रमुख, पोलिस अधिकारी यांच्यासमवेत पालखी मार्गावर केलेल्या कामांचा आढावा घेतला. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिलेल्या सूचनांनुसार खड्डे दुरूस्ती करणे, झाडाच्या फांद्या छाटणे, अतिक्रमण काढणे, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवणे ही कामं विनाविलंब करवीत असे आदेश नवल किशोर राम यांनी दिले.

डेंगीवरीलऔषध-भूषण-माधवी

डासांपासून फैलावणाऱ्या डेंगीवर प्रभावी आणि परवडणारी उपचारपद्धती विकसित करण्यासाठी पुण्यातील सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया आणि जिनिव्हा इथली आंतरराष्ट्रीय वैद्यकीय संशोधन संस्था; ड्रग्ज फॉर निग्लेक्टेड डिसिजेस इनिशिएटिव्ह-डीएनडीआय यांच्यात सामंजस्य करार झाला. त्यानुसार विशिष्ट प्रतिपिंड तयार करण्यात आली असून या औषधाची तिसऱ्या टप्प्यातील मानवी चाचणी सुरू आहे. त्यानंतर हे औषध बाजारात येणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे. दरम्यान, सीरमनं पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात केलेल्या चाचण्या पूर्ण झाल्या असून त्यात हे औषध सुरक्षित आणि प्रभावी असल्याचं सिद्ध झालं  आहे. आता तिसऱ्या आणि अंतिम टप्प्यातील चाचणी सुरू आहे.

Pcmc-सीमा-माधवी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी ३० जूनपूर्वी मालमत्ता कर भरावा आणि महापालिकेकडून दिल्या जाणाऱ्या विविध सवलतींचा लाभ घ्यावा, असं आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केलं आहे. आतापर्यंत ऑनलाईन माध्यमातून कर भरणाऱ्या सुमारे १ लाख ८९ हजार ८२३ नागरिकांनी १० टक्के सवलतीचा लाभ घेतला असून, केवळ ऑनलाईन व्यवहारांमधूनच १८९ कोटी रुपयांचं कर संकलन झालं आहे.

प्रकाशन-शिवराज-माधवी

वसुंधरा चांगली राहिली तर मानवी जीवन उत्तम राहिल, असं सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. शेषराव पाटील यांनी आज पुण्यात सांगितलं. सेवानिवृत्त वनाधिकारी रामदास पुजारी यांनी लिहिलेल्या 'पर्यावरणविषयक घोषवाक्ये' या पुस्तकाचं प्रकाशन पुण्यातील वनभवनात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

बाजारसमिती-सीमा-माधवी

सततच्या पावसामुळे पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात फळभाज्यांची आवक मंदावली आहे. मटारच्या भावात वाढ झाली तर अन्य फळभाज्यांच्या दरात तेजी कायम आहे. पालेभाज्यांचीही आवक कमी झाली असून अंबाडी चुका चवळी यांच्या भावात वाढ झाली. फुलांची आवक वाढली असून मागणी स्थिर असल्याने दर खाली आले आहेत.

हवामान

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं; कमाल 30 आणि किमान 22 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. उद्याही दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,